# *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**
**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक – ४४०/२०२२/अहमदनगर**

| | | |
|---|---|---|
| १ श्री. रोडे अरुण रामदास<br>मु. पो. धोत्रे बु., ता. पारनेर, जि. अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा,<br>कक्ष अधिकारी,<br>सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद कार्यालय,<br>अहमदनगर, ता.जि. अहमदनगर. | : | प्रतिवादी |
| २ प्रथम अपिलीय अधिकारी तथा,<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद कार्यालय,<br>अहमदनगर, ता.जि. अहमदनगर. | : | प्रतिवादी |

**सुनावणी दिनांक – १२/०१/२०२३**

अपिलार्थी यांनी दि. ०५/०१/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी दि.१२/०१/२०२३ रोजी आयोजित करण्यात आली होती.

**सुनावणीसाठी उपस्थित-** अपिलार्थी वगळता सर्व पक्षकार उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी दि. २५/०१/२०२१ रोजीचा माहिती अर्ज दिनांक २८/०१/२०२१ रोजी प्राप्त झाला. सदर माहिती अर्जान्वये दिनांक २७/१२/२०१९ ते आज अखेर या कालावधीतील विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक विभाग नाशिक यांचे पत्र जा.क्र. २०१९/४७२५६ (८६०) वि आ शा./आस्था-१ दि. २७/१२/२०१९ जा.क्र. १७१९७ च्या पत्रानुसार केलेल्या पत्रा नुसार चौकशी अहवाल व सोबत टिपणीच्या झेरॉक्स प्रती याबाबतची माहिती मिळण्याची विनंती केली होती. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी कार्यासन आस्था-१, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, अहदमनगर यांना दिनांक २९/०१/२०२१ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती कार्यासनाशी संबंधित असल्याने अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे सुचीत केले. तसेच त्याबाबत अपिलार्थीस अवगत केले. त्यानंतर जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, साप्रवि-१, जिल्हा परिषद कार्यलय, अहमदनगर यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक गट विकास अधिकारी, ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना दिनांक १२/०२/२०२१ रोजीच्या

पत्रान्वये अपिलार्थी यांचा माहिती अर्ज अधिनियम २००५, अंतर्गत नियम ६ (३) नुसार आपले विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला असुन अपिलार्थीस त्याबाबत अवगत केले होते.

तद्नंतर अपिलार्थी यांनी दि. ०४/०३/२०२१ च्या अर्जान्वये प्रथम अपिल दाखल केले. महाराष्ट्रात अहमदनगर जिल्हयात कोविड प्रार्दुभाव जास्त असल्याने सुनावणी घेता आली नव्हती. तसेच अपिलार्थी यांनी सदरचे अपिल अर्जावर कोरोना परिस्थितीत सुधारणा झालेनंतर अपिल अर्जावर सुनावणी घेण्यात यावी अशी दिनांक २६/०४/२०२१ चे लेखी अर्जान्वये विनंती केलेली होती. त्यानंतर कोरोना परिस्थितीत थोडी सुधारणा झालेने दिनांक २३/०८/२०२१ रोजी सदर प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी घेऊन दिनांक २०/०९/२०२१ रोजी निर्णय पारित करुन अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक गट विकास अधिकारी, ग्रामपंचायत विभाग जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याशी संबंधीत असल्याने त्यांच्या कडे हस्तांतरणाने प्राप्त झालेल्या अर्जानुसार संबंधीत अपिलकर्ता यांना माहिती पुरवण्यात आली असल्यास तसे संबंधीत अपिलार्थी यांना पुनश्च: अवगत करावे व माहिती पुरविली नसल्यास संबंधीत अपिलकर्ता यांना सदर माहिती १५ दिवसात मोफत पुरविण्यात यावी असे निर्देश देवुन प्रथम अपिल निकाली काढले.

त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक गट विकास अधिकारी, ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी अपिलार्थीस दिनांक ३०/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप.) यांचे कडील पत्र क्र. साप्रवि२/ग्राप/आस्था/६७५/२०२० दिनांक ०२/०७/२०२१ नुसार माहिती देण्यात आलेली आहे. तरी पुनश्च: माहिती या सोबत देण्यात येत असल्याचे कळविले.

सुनावणीदरम्यान तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यासन आस्था-१, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, अहदमनगर यांच्या कडील असल्याचा समज झाल्याने माहिती अर्ज त्यांच्या कडे वर्ग करण्यात आला मात्र अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती संबंधीत प्राधिकारणाकडे नसुन ग्रामपंचायत विभागाकडील असल्याचे दिसुन आल्यानंतर सहाय्यक गट विकास अधिकारी, ग्रामपंचायत विभाग जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्या कडे माहिती अर्ज वर्ग करण्यात आला होता. त्यानुसार सहाय्यक गट विकास अधिकारी यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप.) जिल्हा परिषद अहमदनगर यांच्या स्वाक्षरीने यांनी अपिलार्थीस दिनांक ०२/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये माहिती बाबत वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविण्यात आले होते. तसेच प्रथम अपिल निर्णयात देखील सहाय्यक गट विकास अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे निर्देश देवुन प्रथम अपिल निकाली काढण्यात आले होते. सदर कालावधीत कोरोना कालावधीमुळे अपिलार्थीस माहिती पुरविण्यास विलंब झाला असुन क्षमापित करावे. तसेच सहाय्यक गट विकास अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथम अपिल आदेशानुसार मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप) यांचे कडील पत्र पुन्हा पुरविण्यात आले होते.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक २५/०१/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी

वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस कार्यालयातील उपलब्ध माहिती तसेच वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविल्याचे स्पष्ट होते. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही, ही बाब विचारात घेता अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये केलेली कार्यवाही योग्य असून प्रस्तुत अपिलात काहीही तथ्य नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक ४४०/२०२२/अहमदनगर निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

**(समीर सहाय)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

**क्रमांक : रामाआ- नाशिक/द्वि.अ.क्र./४४०/२०२२/अहमदनगर ओ-** ४२० **दिनांक-** 03/08/2023

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक